पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ९

सभावृत्तांत

दिनांक:- १८/११/२०१५ वेळ. दुपारी ४.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १८/११/२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सायकर अजय शंकरराव
७. मा.जाधव साधना रामदास
८. मा.जाधव राहुल गुलाब
९. मा.पवार संगीता शाम
१०. मा.तानाजी विठ्ठल खाडे
११. मा.चिखले(मराठे) अश्विनी अजित
१२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
१३. मा.भालेकर पंकज दत्तात्रय
१४. मा.भालेकर प्रविण महादेव

याशिवाय श्री. दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी तथा सभासचिव, श्री. प्रदीप पुजारी प्र.कार्यकारी अभियंता जलनि:सारण / उपअभियंता झोनिपू, श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री. तानाजी दाते (सहा.आरोग्य अधिकारी), श्री.हनुमंत शिंदे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.शहाजी गायकवाड उपअभियंता (स्थापत्य), श्री.अ.ना.आडसूळे प्रभारी उपअभियंता (विद्युत), सतीश सर्जेराव गोरे (पशु वैद्यकीय अधिकारी), श्री.गायकवाड पी.एस. उद्यान अधिक्षक, श्री.मोरे सी.सी (हॉर्टी. सुपरवायझर),श्री.गायकवाड टी.डी.( हॉर्टी. सुपरवायझर), श्री.वैभव पुसाळकर उपअभियंता स्था.उद्यान, श्री.जे.डी.जाधव,श्री. गि. शं. गुठे, श्रीम.वृषाली पाटील, श्री.स्वामीजंगम जी.डी., श्री.वायाळ लक्ष्मण आण्णा, श्री. कोबल एस.के., कु.गव्हाणे पी.बी.,क.अभियंता, सुभाष पवार (क्रीडा पर्यवेक्षक), इ. अधिकारी सभेस हजर होते.

सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले.दि. ९/१०/२०१५ व दि. (कार्यपत्रिका क्र.८ ) चा सभावृत्तांत कायम करणेत आला.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक:- मा.पंकज भालेकर अनुमोदक:- मा. शांताराम भालेकर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीच्या सभापती मा. स्वाती प्रमोद साने यांचे सासरे माजी ग्रामपंचायत सदस्य, चिखली व माजी अध्यक्ष भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली कै. नामदेव दगडू साने तसेच कै.शेवंताबाई हनुमंत भालेकर,कै. विमल तुकाराम भालेकर रा.तळवडे यांचे दि. १८/११/२०१५ रोजी दु:खद निधन झाले असलेने त्यांना आजच्या मासिक सभेत श्रध्दाजंली अर्पण करावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा.सभापती:- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१** निगडी प्रभाग क्र.१३ अंकुश चौक, या ठिकाणी एकेरी वाहतुक चालू करण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांना सेक्टर नंबर २२ ते साईनाथ नगर येथे जाण्यासाठी रस्ता ओलांडण्यासाठी खूपच त्रास सहन करावा लागत आहे. या चौकात वाहतूक सिग्नल बसविणेबाबत
मा.अश्विनी (चिखले) मराठे व मा.राहुल जाधव यांचा प्रस्ताव

**विषय क्र.२** प्रभाग क्र.१३, निगडी जकात नाका, येथील शेवटचा बीआरटी बस स्टॉप ला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे असे नांव देणेबाबत
मा. अश्विनी (चिखले) मराठे व मा.राहुल जाधव यांचा प्रस्ताव

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-**

ठराव क्र. २१ — विषय क्र.१

दि. १८/११/२०१५ — विभाग .......

सुचक:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित — अनुमोदक:- मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

संदर्भ:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित यांचा दि. ९/१०/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-प्रभाग क्र.१३ यमुनानगर येथील विविध चौकास नामकरण करणेबाबत

१) भक्ती शक्ती चौकास "**भक्ती शक्ती चौक**" असे नामकरण करण्यात यावे

२) भक्ती शक्ती चौक ते त्रिवेणी नगर चौकात एकेरी वाहतूक चालू करण्यात यावी. व या संदर्भात वाहतूकीस अडथळा निर्माण होवु नये या संदर्भात मार्ग फलक लावण्यात यावेत.

३) लोकशाहिर आण्णाभाऊ साठे क्रीडांगण, साईनाथ – यमुनानगर प्रभाग क्र.१३ या ठिकाणी उभारण्यात आलेली प्रेक्षक गॅलरी यांस "**स्व. बाळासाहेब ठाकरे**" असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

-----

ठराव क्र. २२ — विषय क्र.२

दि. १८/११/२०१५ — विभाग

सुचक:- मा.संगीता शाम पवार — अनुमोदक:- मा.जाधव राहुल गुलाब

संदर्भ:- मा. संगीता शाम पवार यांचा दि. ९/१०/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-चौका चौकामध्ये नामकरणाच्या पाटया लावणेबाबत

१) लष्करे चौक राज नगर

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर चिर्ल्डन पार्क संजय नगर

३) सोमेश्वर मंदिर चौक मिलींद नगर जेतवन बौध्दविहार चिर्ल्डन पार्क मिलींद नगर,

४) व्यंकटेश बालाजी मंदिर संस्कृत भवन राजनगर

५) किसन अनिल पवार चौक बौध्द नगर नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

-----

ठराव क्र. २३ विषय क्र.३

दि. १८/११/२०१५ विभाग

सुचक:- मा.संगीता शाम पवार अनुमोदक:- मा.जाधव राहुल गुलाब

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा दि. ९/१०/२०१५ चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील यमुनानगर, कै.मधुकर पवळे हायस्कुल, मासुळकर कॉलनी, कृष्णानगर, त्रिवेणीनगर, कुदळवाडी-जाधववाडी,रुपीनगर-तळवडे,निगडी गावठाण, चिखली,संभाजीनगर या १० प्रभागामध्ये दि.१४/१०/२०१५ पासुन दि.३०/१०/२०१५ या कालावधीत प्रभागातील नगरसदस्य/नगरसदस्या यांचेमार्फत क्षेत्रसभा आयोजन करण्यात आलेल्या होत्या. सर्व प्रभागातील क्षेत्रसभाचे सभावृत्तांत मा.प्रभाग समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले**

ठराव क्र. २४ विषय क्र. ४

दि. १८/११/२०१५ विभाग

सुचक:- मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित अनुमोदक:- मा.जाधव राहुल गुलाब

संदर्भ:- मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित यांचा दि.१८/११/२०१५ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.१३, निगडी, अंकुश चौक, या ठिकाणी एकेरी वाहतुक चालू करण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांना सेक्टर नंबर २२ ते साईनाथ नगर येथे जाण्यासाठी रस्ता ओलांडण्यासाठी खूपच त्रास सहन करावा लागत आहे. तरी या चौकात वाहतूक सिग्नल बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र. २५ विषय क्र. ५

दि. १८/११/२०१५ विभाग

सुचक:- मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित अनुमोदक:- मा.जाधव राहुल गुलाब

संदर्भ:- मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित यांचा दि.१८/११/२०१५ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.१३, निगडी, जकात नाका, येथील शेवटचा बीआरटी बस स्टॉप ला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे असे नांव देणस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

(बो-हाडे शुभांगी संजय)

अध्यक्षा

फ प्रभाग समिती

निगडी ४४

क्रमांक – फक्षेका/सभा/कावि/ २२९/२०१५

दिनांक- २०/११/२०१५

सही/-

(प्रशासन अधिकारी)

सचिव सभा शाखा

फ क्षेत्रीय कार्यालय